**<u>ठळक बातम्या</u>**

- आपले सरकार पोर्टलवर नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सेवा व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या २६ लाख अपात्र लाभार्थ्यांची प्रत्यक्ष छाननी करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- राज्यातल्या ३ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

**आणि**

- महिनाअखेरपर्यंत राज्याच्या सर्व विभागांमधे कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><>**

राज्य शासनाच्या विविध विभागांकडून आपले सरकार पोर्टलवर नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सेवा व्हॉट्सअ‍ॅप च्या माध्यमातून पुरवाव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिल्या आहेत. सेवा सुलभीकरणासाठी आज मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. सर्व सेवा योग्य प्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्याच्या दृष्टीनं सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे पडताळणी करावी, अर्ज प्रक्रियेत लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करावी वगैरे सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

भागीदारी संस्था निबंधक कार्यालयाच्या सुधारित संकेतस्थळाचा प्रारंभही आज मुख्यमंत्र्यांनी केला.

**<><><><>**

२०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्राचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तयार होणारं व्हिजन डॉक्युमेंट जनसामान्यांच्या संकल्पनांचं प्रतिबिंब असावं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत सांगितलं. या आराखड्याच्या प्रारूप मसुदा सादरीकरणाच्या बैठकीत मुंबईत ते बोलत होते. अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समावेश

असलेला हा आराखडा जनतेच्या संकल्पना जाणून घेऊन तयार केल्या असून त्यात चार लाखापेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवला.

<><><><>

राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटीच्या सुमारे ८३ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा ऑगस्ट महिन्याचा पगार गणेशोत्सवापूर्वी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटीच्या विविध सवलतींपोटीची प्रतिपूर्ती रक्कम लवकर देण्याची विनंती राज्य सरकारला केली, त्यानुसार आज या संदर्भातला शासन निर्णय जारी केला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या २६ लाख लाभार्थ्यांची छाननी करण्याचे आदेश राज्य सरकारनं जिल्हा पातळीवरच्या यंत्रणेला दिले आहेत. सर्व जिल्ह्यातले हे लाभार्थी अपात्र असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान विभागानं कळवलं आहे. त्यांची प्रत्यक्ष छाननी करण्याचे आदेश दिल्याची माहिती महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. छाननीनंतर त्यांची पात्रता-अपात्रता ठरणार आहे. अपात्र लाभार्थ्यांवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार कारवाई केली जाईल, असं तटकरे यांनी सांगितलं आहे.

<><><><>

कोल्हापूर जिल्ह्यातल्या विकास प्रकल्पांना आवश्यक निधीची कमतरता भासणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. कोल्हापुरात विकास प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते. कोल्हापुरात १०० दिवस प्लॅस्टिक बंदी अभियान राबवण्यात येत आहे, या अभियानाचा प्रारंभ आज अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यावरणाच्या रक्षणासाठी एकल वापराच्या प्लॅस्टिकचा वापर थांबवावा तसंच विविध कार्यालयांबरोबरच शासकीय, निमशासकीय कार्यालयांत प्लॅस्टिकच्या बाटल्या बंद कराव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

<><><><>

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि पाटणा उच्च न्यायाधीश न्यायमूर्ती विपुल पांचोली यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं राज्यातल्या ३ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर केले आहेत. त्यात नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन, लातूरचे डॉ. संदीपान जगदाळे आणि मुंबईतल्या सोनिया कपूर यांचा समावेश आहे. डॉ. शेख नांदेडमधल्या अर्धापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत तर कपूर या मुंबईतल्या अणूऊर्जा महामंडळाच्या शाळेत शिक्षिका आहेत. या पुरस्काराविषयी लातूरच्या दयानंद कॉलेजातले संगीत शिक्षक डॉ. संदीपान जगदाळे म्हणाले…

- **- होल्ड - जगदाळे - -**

५० हजार रुपये आणि रजत पदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<><><><>**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मोर्चा २७ ऑगस्टला मुंबईकडे निघणार आहे. मराठा आणि कुणबी एकच असून यासाठीचा शासन आदेश जारी करावा, ही या मोर्चाची मागणी असल्याचं जरांगे यांनी जालना इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. सग्यासोयऱ्यांचा आदेश निघून दीड वर्ष झालं मात्र त्याची अमलबजावणी अजूनही झाली नाही, ती लवकरात लवकर करावी अशी मागणी त्यांनी केली. आंदोलकांनी मोर्चात शांतता बाळगावी असं आवाहन मनोज जरांगे यांनी केला.

नांदेड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात आंदोलक मोर्चात सहभागी होणार असून ते उद्या आंतरवली सराटी इथं दाखल होणार आहेत.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घ्या असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले असतानाही अजून या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झालेला नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज केली. सपकाळ यांनी छत्रपती संभाजीनगर इथं आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज

मराठवाड्यातल्या पाच जिल्ह्यांची आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेसने या निवडणुकांसाठी तयारी सुरु केली असून आघाडीच्या निर्णयावर राज्य पातळीवर चर्चा झालेली नाही. सध्या स्थानिक पातळीवरच मित्रपक्षांशी चर्चा करून निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत, असंही सपकाळ यावेळी म्हणाले.

<><><><>

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नियोजनबद्ध रणनीती आखण्यात येईल, असं एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी म्हटलं आहे. ते आज बीड जिल्ह्यात माजलगाव इथं आयोजित सभेत बोलत होते.

<><><><>

भारतीय जनता पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा कार्यालयात आज झालेल्या वार्ताहर परिषदेत मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडनवीस यांनी ही घोषणा केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर मुंबईला नवा अध्यक्ष देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार अमित साटम यांची निवड प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका प्रशासन गणेशोत्सवासाठी सज्ज झालं आहे. महानगरपालिकेच्या वतीनं शहरात ५३ कृत्रिम विसर्जन कुंड, ११ नैसर्गिक विसर्जन केंद्र, २५ मूर्ती दान केंद्र , २८ निर्माल्य कुंड तयार करण्यात आले आहेत. यासाठी २५२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी यांनी आज ही माहिती दिली.

<><><><>

अपघातांचं प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. त्यासाठी आगामी गणेशोत्सवात वाहतूक नियम जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

<><><><>

गणेशोत्सवासाठी ठाणे महापालिकेने कृत्रिम तलाव, फिरती विसर्जन व्यवस्था यामध्ये वाढ केली आहे. या संपूर्ण व्यवस्थेची माहिती देण्यासाठी हरित विसर्जन ॲप तयार केले असून नागरिकांनी त्यावर नोंदणीचे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

<><><><>

गणेशोत्सवात करावयाच्या कामांची कार्यप्रणाली तयार करावी, प्रत्येक विभागाच्या कार्यकक्षा निश्चित कराव्यात, जेणेकरुन प्रत्येक वर्षीच्या आयोजनासाठी सुयोग्य मसुदा तयार होईल अशा सूचना नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिल्या.

<><><><>

अतिवृष्टीमुळे थांबवण्यात आलेली रायगड जिल्ह्यातल्या आंबेनळी घाटातली वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे. अतिवृष्टीच्या काळात या मार्गावरची वाहतूक पुन्हा बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

<><><><>

ठाणेकरांना दीर्घकाळापासून प्रतीक्षा असलेल्या गायमुख ते कॅडबरी जंक्शन मार्गावर सप्टेंबर महिन्यांत मेट्रोची चाचणी होणार आहे. यासाठी दोन कोच आणि इंजिन दाखल झालं आहे.

<><><><>

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा द्वारका उत्सव अकोला जिल्ह्यात यंदा उत्साहात साजरा झाला. द्वारका उत्सवानिमित्त मुंडगाव इथल्या नागरिकांनी बैलांची आकर्षक सजावट करून त्यांची गावातून मिरवणूक काढली. यात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

<><><><>

महिनाअखेरपर्यंत राज्याच्या सर्व विभागांमधे कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

या काळात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असून, येत्या शनिवारपर्यंत किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

येत्या दोन दिवसात, विदर्भातही अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

//<><><><>//